www.attalmat.com

# अट्टलमत

RNI.No. MAHMAR/2007/21199 Postal Regd. No : H2/RNP/AGD/283/2022-23

■ वर्ष –19, अंक–47 ■ छत्रपती संभाजीनगर, दि. सोमवार, 27 जुलै 2026 ■ किंमत 2 रूपये, पाने –4

**राज्यावर कोणतेही संकट येऊ नये; माझा बळीराजा सुखी आणि समाधानी राहावा– पालकमंत्री संजय शिरसाट**



सविस्तर वृत्त पान ४ वर

# पंढरपूर कॉरिडॉरचे काम कोणावरही अन्याय न करता योग्य पुनर्वसन करून पूर्ण करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## आषाढी एकादशीनिमित्त मुख्यमंत्र्यांच्या हस्ते श्री विठ्ठल-रुक्मिणीची शासकीय महापूजा

**पंढरपूर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी दरवर्षी वाढणारी भक्तांची गर्दी पाहता त्यांना उत्तम सोयी उपलब्ध करून देण्यासाठी मंदिर परिसर विकासाचे काम पंढरपूर कॉरिडॉरच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. कोणावरही अन्याय न करता सर्वांचे योग्य पुनर्वसन करून हे काम येत्या अडीच वर्षांत पूर्ण करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

आषाढी शुद्ध एकादशी निमित्त श्री विठ्ठल–रुक्मिणीची शासकीय महापूजा मुख्यमंत्री फडणवीस यांनी सपत्नीक तसेच मानाचे वारकरी बाबासाहेब माधव माने, प्रभावती बाबासाहेब माने या दाम्पत्यासमवेत केली. त्यानंतर श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने झालेल्या सत्कारप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर, अमृता फडणवीस, आमदार समाधान आवताडे, राजेंद्र राऊत, सुरेश खाडे, बापूसाहेब पठारे, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, मंदिर समितीचे सह–अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.



मागील काळात सुरू केलेले मंदिर विकासाचे काम बहुतांश पूर्ण झाले असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, ङ्गपांडुरंगाचे दर्शन घेण्यासाठी लाखो लोक येतात. येथे अत्यंत कमी जागा आहे. आता मोठी जागा तयार करणे गरजेचे आहे. यावर्षी हे काम सुरू करायचे आहे. कॉरिडॉर विकासात येथील व्यावसायिकांचा व्यवसाय वाढेल, नागरिकांना घरे मिळतील, भाडेकरूंची व्यवस्था होईल, अशा पद्धतीने त्याची रचना करण्यात आली आहे. हे काम पूर्ण झाल्यानंतर कितीही भाविक आले तरी अतिशय उत्तम व्यवस्था या ठिकाणी होईल.ङ्ग

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ङ्गयावेळी वारीने एक नवा उच्चांक गाठला आहे. यावर्षी २५ किलोमीटरपेक्षा जास्त लांबीची दर्शनासाठी रांग लागली होती. परंतु दर्शनासाठी २५ तास लागले तरीही कोणीही नाराज न होता, न थकता त्या ठिकाणी आनंदाने विठ्ठल नामाचा गजर करत हे दर्शन घेत आहेत. चंद्रभागेचे पाणी स्वच्छ राहील याची काळजी घेण्यात आली आहे. यावेळी पालकमंत्र्यांनी वाळवंटात अतिशय सुंदर व्यवस्था केल्यामुळे तिथला कचरा, विष्ठा आदी संपूर्ण स्वच्छता झाली आहे. त्यामुळे अतिशय सुंदर वाळवंट आपल्याला पुन्हा एकदा पाहायला मिळत आहे. आपण सर्वजण करत असलेली सेवा श्री विठ्ठल स्वीकारतील आणि त्यांचा आशीर्वाद आपल्या सर्वांना सदैव मिळेल, अशी प्रार्थना मी त्यांच्या चरणी करतो.ङ्ग

लाखो भक्त विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघतात. अनेक वारकरी कळसाच्या दर्शनावरच समाधान मानतात. जणू काही विठुरायाचीच भेट झाली आहे, अशा भावनेने लोक जातात. या अनोख्या सोहळ्यात सहभागी होण्याची संधी मिळणे, ही देखील एक पर्वणी आहे. महाराष्ट्राच्या जनतेच्या वतीने आपला प्रतिनिधी म्हणून केलेली ही पूजा संपूर्ण महाराष्ट्रातील आणि जगभरातील पांडुरंगाच्या भक्तांच्या वतीने केलेली पूजा आहे,ङ्ग असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले, ङ्गयेणारा वारकरी हा शेतकरी, शेतमजूर, बारा बलुतेदार, उद्योजक अशा सर्व क्षेत्रातील आहे. विठुरायाची सेवा जरी आपल्याला करता आली नाही, तरी वारकऱ्यांची, शेतकऱ्यांची सेवा केली तरी ती सेवा विठुरायापर्यंत पोहोचते. त्यामुळे यावर्षी शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडावे, यासाठी ५६ लाख शेतकऱ्यांची कर्जमाफी, शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय आणि थकीत वीजबिले माफ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.ङ्ग

प्रारंभी श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिर समितीचे सह–अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी प्रास्ताविक केले. ङ्गश्री विठ्ठल मंदिराला पाठबळ देणे, निधी देणे आणि विकास करण्याचे काम मुख्यमंत्र्यांनी केले आहे. आज विठुमाऊलीच्या दर्शनासाठीच्या रांगेचे अत्यंत चांगल्या प्रकारे व्यवस्थापन केले आहे. दर्शन रांगेत ५० ते ६० हजार वारकरी असले तरी पालकमंत्र्यांनी राज्य शासन आणि प्रशासनाच्या माध्यमातून अत्यंत चांगल्या सुविधा केल्यामुळे दर्शन सुसह्य झाले आहे, असे ते म्हणाले. शासकीय महापूजेचे मानाचे वारकरी मु.पो. गौरगाव, ता. कळंब, जि. धाराशिव येथील बाबासाहेब माधव माने आणि सौ. प्रभावती माने या दाम्पत्याचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमृता फडणवीस यांच्या हस्ते महापूजेनंतर सन्मान करण्यात आला. तसेच एसटी महामंडळाकडून त्यांना वर्षभर मोफत एसटी प्रवास पास वितरित करण्यात आला.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते ‘श्री विठ्ठल निर्मल दिंडी’ पुरस्कार वितरण –** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पाणी, स्वच्छता, पर्यावरण संरक्षण, प्लास्टिकमुक्त वारी, वृक्षसंवर्धन आदी विषयांवर प्रबोधन करणाऱ्या दिंड्यांना ‘श्री विठ्ठल निर्मल दिंडी’ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यामध्ये प्रथम क्रमांक श्री विठ्ठल–रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूर, द्वितीय क्रमांक वारकरी धर्मसंकीर्तन सेवा प्रतिष्ठान, जालना आणि तृतीय क्रमांक गोऱ्हेकर संस्था, आळंदी देवाची यांना पुरस्कार व धनादेश देण्यात आला.

# आपली वारी स्वच्छ वारी महा स्वच्छता अभियान

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी पंढरपूर यात्रेतील घनकचरा व्यवस्थापनासाठी जिल्हाधिकारी कार्यालय छत्रपती संभाजीनगर, इकोसत्त्व इन्व्हायरमेंटल सोल्युशन प्रा. लि. छत्रपती संभाजीनगर, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, नगर परिषद छावणी औरंगाबाद, जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर, व्हेरॉक, सिडको वाळूज महानगर छत्रपती संभाजीनगर द्वारे खाम नदी पुनरुज्जीवन अभियाना अंतर्गत नियोजन केले. दरवर्षी या दिवशी सुमारे ८ ते १० लाख भाविक पायी वाळूज स्थित पंढरपूरला जातात. नगर नाका ते छोटा पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरापर्यंत, विठ्ठल भक्तांनी वारीतील वारकऱ्यांच्या सेवेसाठी विविध स्टॉल/मंडपही उभारले होते. परंतु या पवित्र कार्यामुळे संपूर्ण मार्गात मोठ्या



प्रमाणात कचरा निर्माण होतो. इकोसत्त्व टीमने कार्यक्रमादरम्यान आणि नंतर योग्य व्यवस्थापन, जनजागृती आणि हस्तक्षेप करून स्वच्छता राखण्याचा प्रयत्न केला.

इकोसत्वची टीम गेली ८ वर्षे हा उपक्रम राबवत असून या काळात सिडको, कॅन्टोन्मेंट कॅम्प, पोलीस कर्मचारी आणि अनेक स्वयंसेवक हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आणि वारीचे पावित्र्य राखण्यासाठी आम्हाला सहकार्य करत असतात. या वर्षी, इकोसत्व टीमने रिंगण सोहळ्याच्या ठिकाणी स्वच्छतेवर भर दिला व सोबत काम करणाऱ्या सहयोग फाऊंडेशनचे स्वयंसेवक, व्हेरॉक ग्रुपचे कर्मचारी, संभाजीनगर प्लॉगर्स, ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट, नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, महात्मा गांधी विद्यापीठ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि इतर अनेक जण सामील झाले होते.

या दिवसभर चाललेल्या हस्तक्षेपातून, ४०० स्वयंसेवकांच्या पाठिंब्याने, टीमने १०४९० किलो वर्गीकृत कचरा संकलन करण्यात यश मिळवले जे कंपोस्टिंग आणि संसाधन पुनर्प्राप्तीसाठी पाठवले गेले आहे. त्यामुळे जवळून वाहणाऱ्या खाम नदीतील घनकचऱ्याचे प्रदूषण थेट रोखले गेले. नागरिकांची सतर्कता, जागरूकता, आणि जबाबदारी खाम नदी पुनर्जीवन अभियान अधिक बळकट करून उद्देश साध्य करण्यास मदत करेल.

## धक्कादायक! आश्रमशाळेतील ४० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा; जेवणानंतर उलट्या, पोटदुखीने उडाली खळबळ

**अमरावती :** अमरावतीच्या मेळघाट परिसरातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. धारणी तालुक्यातील टीटंबा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील सुमारे ३० ते ४० विद्यार्थ्यांना अन्नातून विषबाधा झाल्याची घटना घडली आहे. रात्रीचे जेवण केल्यानंतर विद्यार्थ्यांना अचानक उलट्या, मळमळ आणि तीव्र पोटदुखीचा त्रास सुरू झाल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. विशेष म्हणजे, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे या मेळघाट दौऱ्यावर असतानाच ही घटना घडल्याने प्रशासनात एकच खळबळ उडाली.

**जेवणानंतर विद्यार्थ्यांची प्रकृती बिघडली :**

टीटंबा येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत सुमारे ४०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गुरुवारी (२५ जुलै) रात्रीचे जेवण झाल्यानंतर काही वेळातच ३० ते ४० विद्यार्थ्यांना उलट्या, मळमळ आणि पोटदुखीचा त्रास जाणवू लागला. विद्यार्थ्यांची प्रकृती खालावल्याचे लक्षात येताच आश्रमशाळा प्रशासनाने तातडीने त्यांना धारणी उपजिल्हा रुग्णालयात हलवले. सध्या सर्व विद्यार्थ्यांवर उपचार सुरू असून त्यांच्या प्रकृतीवर डॉक्टरांचे लक्ष आहे.

# पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण नको!

नवी दिल्ली येथील जंतर-मंतर याठिकाणी सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनात पोलिसांनी बळाचा वापर केला, असा आरोप होत आहे. आंदोलन करणाऱ्या जमावाला वाटेल ते करू देण्यासाठी पोलीस तैनात नाहीत. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी कायद्यानेच त्यांना काही अधिकार दिले आहेत. जमावाच्या आक्रम कतेवर पांघरूण घालण्यासाठी पोलिसांच्या मनोधैर्याचे खच्चीकरण करणे योग्य नव्हे.

दिल्लीमध्ये जंतर-मंतर येथे 'कॉक्रोच जनता पार्टी'च्या (सीजेपी) वतीने 'नीट' पेपरफुटीप्रकरणी आंदोलन सुरू आहे. या आंदोलनाचा एक भाग म्हणून सीजेपीच्या वतीने संसद भवनावर मोर्चा काढण्यात आला आणि तिथे पोलिसांनी त्यांच्यावर लाठीमार केला, म्हणून सर्वत्र पोलिसांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जात आहे. पण पोलिसांची बाजू कोणीच समजून घेत नाही.स्वत:ला विद्यार्थी म्हणवून घेणारे नेमके कोण आहेत, ते माहीत नाही. स्वत:ला विद्यार्थ्यांचे नेते म्हणवून घेणारे कोणत्या परीक्षेला बसले होते आणि त्या परीक्षांमध्ये काय घोटाळा झाला होता, याचा कुठेही उल्लेख नाही. स्वत:ला नेते म्हणवणाऱ्यांपैकी अभिजित दिपके नावाचा कोणीतरी अमेरिकेतून येतो आणि मला आंदोलन करायचे म्हणतो. त्याला दिल्ली पोलिसांनी लगेच जंतर-मंतरवर आंदोलन करण्याची परवानगी दिली. म्हणजे त्याचा आवाज दाबण्याचा प्रयत्न झाला, असेही नाही. हे सर्व युवक तिथे आंदोलनाला बसले आणि त्यांनी एकच मागणी लावून धरली आणि ती म्हणजे शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा. शिक्षणव्यवस्थेत नेमक्या काय सुधारणा हव्या आहेत, शासनाकडून यासंदर्भात त्यांच्या काय अपेक्षा आहेत, याबद्दल त्यांच्याकडून लेखी मुद्दे आलेले दिसले नाहीत. दरम्यान पेपरफुटीप्रकरणी दोषी आढळलेल्या लोकांवर सरकारने कडक कारवाई केली. ती सर्व मंडळी आज तुरुंगात आहेत. पेपरफुटीचे प्रकरण उघडकीस आल्यानंतर 'नीट' परीक्षा तातडीने रद्द करण्यात आली आणि त्यातील त्रुटी दूर करून पूर्णपणे पारदर्शक पद्धतीने ती पुन्हा घेण्यात आली. २२ लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली, त्यापैकी ११ लाख विद्यार्थ्यांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळाला. म्हणजे या विद्यार्थ्यांची तशी तक्रार नाही. त्यांची एवढीच अपेक्षा होती, की आमची परीक्षा व्यवस्थित व्हावी आणि चांगले गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना अपेक्षित वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा.

सरकारने विद्यार्थ्यांची ही अपेक्षा आपणहून पूर्ण केली. याशिवाय त्यांच्या काही मागण्या असतील तर त्या त्यांनी सरकारला लेखी स्वरूपात द्यायला हव्यात. त्यावर सरकारने विचार करून त्यांची पूर्तता केली असती. पण असे काही न करता त्यांनी २० जुलै रोजी संसदेवर मोर्चा काढणार असल्याचे जाहीर करून टाकले. त्याच दिवशी संसदेचे अधिवेशन सुरू होणार होते. भारतीय संसद हे अतिसंवेदनशील ठिकाण असल्यामुळे आणि तिथे कायदा आणि सुव्यवस्था राखणे, हे पोलिसांचे कर्तव्य असल्यामुळे भारतीय न्यायसंहितेच्या कलम '१६३ ब' आणि पूर्वीच्या भारतीय दंड संहितेच्या '१४४' नुसार या परिसरात पाच किंवा अधिक लोकांना एकत्र येण्यास बंदी घालण्यात आली. अर्थात संसदेवर मोर्चा काढायचा असेल तरी पोलीस परवानगी देतात, पण त्यासाठी मोर्चा काढणाऱ्यांना आपण कोण आहोत, मोर्चा काढण्याचे कारण काय, मोर्चामध्ये किती लोकांचा सहभाग असणार आहे, जमाव तिथे काय करणार आहे, हे स्पष्ट करावे लागते. सीजेपीने अशी कोणतीही परवानगी घेतली नाही. २० जुलै राजी तिथे देशातल्या अनेक भागांमधून युवक येण्यास सुरुवात झाली. यात विद्यार्थी किती होते, विविध राजकीय पक्षांचे भाडोत्री आंदोलक किती होते, गुंड होते की बेकायदेशीर कामे करणारे होते, याची काहीच कल्पना नव्हती. ही मंडळी आपणहून आलेली नव्हती, तर त्यांना कोणीतरी आणलेले होते. त्यांना आणणाऱ्यांना स्वत:चे चेहरे प्रकाशात येऊ द्यायचे नव्हते. त्यांनी या मुलांना भडकावून धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची मागणी करा, असे सांगितले होते.

मोर्चा निघताना आम्ही पुष्पगुच्छ घेऊन निघालो आहोत असे दाखवण्यात आले. पण हा केवळ देखावा होता. मागे असलेल्या युवकांसमोर कोणतेही नेतृत्व नव्हते, कोण काय सांगत आहे, याकडे त्यांचे लक्ष नव्हते. संसदेवर काही वेळा हल्ले झाले आहेत, हे आपल्याला माहीत आहे. लोकशाहीच्या दृष्टीने संसद ही अत्यंत महत्त्वाची जागा आहे. संसदेवर मोर्चा आल्यानंतर मोर्चेकऱ्यांनी 'बॅरिकेड्स'च्या अलीकडे थांबावे आणि आपल्या दोन-चार प्रतिनिधींना सरकारशी चर्चा करण्यासाठी पाठवावे, हा दंडक आहे. या मोर्चेकऱ्यांनी मात्र 'बॅरिकेड्स' उधळून लावून किंवा त्यांच्यावर चढून संसदेत घुसण्याचा प्रयत्न केला. अशा प्रकारे संसदेमध्ये शिरू पाहणाऱ्या लोकांना अडवण्याची पोलिसांची जबाबदारी असते. हे मोर्चेकरी नुसता शिरण्याचा प्रयत्न करून थांबले नाहीत, तर त्यांनी तिथे जोरदार दगडफेक सुरू केली. त्याचबरोबर या युवकांनी तिथे बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिसांवरही हल्ले केले आणि काही पोलिसांना बेदम मारहाण करण्यात आली. अगदी पोलीस शिपायापासून विशेष पोलीस आयुक्त दर्जाच्या आयपीएस अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना मारहाण केल्याचे किमान ७२ अधिकृत व्हिडीओज उपलब्ध आहेत. या जमावाने तिथे असलेल्या पेट्रोल पंपावर हल्ला केला, महिला पोलिसांवर हल्ला केला, पत्रकारांवर हल्ला केला. म्हणजे यातून त्यांनी कोणालाच सोडले नाही.

# धाकटी पंढरपूर केले जिल्हा परिषदेतील अधिकारी, कर्मचाऱ्यांनी चकाचक..

**मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता सेवा अभियान**

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

धाकटी पंढरपूर येथे आषाढी एकादशी दिवशी विठ्ठल रुक्मिणी च्या दर्शनासाठी राज्याच्या विविध भागासह मराठवाड्यातून अनेक भाविक दर्शनासाठी आले होते या भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी अन्नदात्यांनी ठिक ठिकाणी स्टॉल लावून अन्नदान केले यातून निर्माण होणारे प्लास्टिकचे व इतर कचऱ्याचे संकलन करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम यांच्या मार्गदर्शनाखाली आज छोटे पंढरपूर येथे स्वच्छता सेवा अभियान राबविण्यात आले




आषाढी एकादशी या पवित्र दिवशी धाकटी पंढरपूर ता. छत्रपती संभाजीनगर येथे मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी आले होते दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अन्नदान करण्यासाठी अन्नदात्यांनी रस्त्याच्या दुतर्फा स्टॉल लावले होते यातून निर्माण होणारा ओला कचरा, सुका कचरा संकलित करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम यांच्या मार्गदर्शनाखाली अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणाचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके यांनी नियोजन केले होते यासाठी मंदिर व ग्रामपंचायत पंढरपूर, रांजणगाव शेणपुंजी, तिसगाव, पाटोदा, वळदगाव परिसरातील १७ स्पॉट निवडण्यात आली होती या प्रत्येक स्पॉटवर विभाग प्रमुख, गट विकास अधिकारी यांची नियुक्ती करून त्यांच्या अधिपत्याखाली कर्मचाऱ्यांनी परीसराची स्वच्छता केली.

रस्त्याच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणात घाण पसरलेली होती रस्त्याची स्वच्छता करण्यात आली ग्रामपंचायतीला एवढ्या मोठ्या प्रमाणात स्वच्छता करणे शक्य नसल्याने जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने पुढाकार घेऊन ओला कचरा सुका कचरा, प्लास्टिक संकलित केले, यामध्ये दोन ट्रॅक्टर भरून छापला निघाल्या जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत स्तरावरील १००० कर्मचाऱ्यांनी या स्वच्छता सेवा अभियानात सहभाग घेतला यामध्ये शिक्षक, ग्रामपंचायत अधिकारी, आरोग्य सेवक, अंगणवाडी सेविका, आशा वर्कर सहभागी झाले होते काल आषाढी एकादशी निमित्त गर्दी मोठ्या प्रमाणात असल्याने विठ्ठलाचे दर्शन घेता आले नाही पण आज प्रत्यक्ष येथे येऊन दर्शन घेऊन स्वच्छता केली त्यात खरा पांडुरंग आज स्वच्छता मोहीम राबवल्यानंतर दिसला व अनुभवला असे सहभागी कर्मचाऱ्यांनी व्यक्त केले. जमा झालेला कचरा संकलित करण्यासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने ट्रॅक्टर घंटागाड्या ची व्यवस्था करण्यात आली तसेच शेजारील ग्रामपंचायती वाळूज, वळदगाव यांनी देखील घंटागाड्या चा पुरवठा केला होता तीन तास चाललेल्या या मोहिमेत मोठ्या प्रमाणात कचऱ्याचे संकलन करण्यात आले जमा झालेला कचरा महानगर पालिकेकडे पुढील प्रक्रिया करण्यासाठी देण्यात आला. स्वच्छता सेवा अभियानात पंढरपूर ग्रामपंचायतचे सरपंच वैशाली राऊत, उपसरपंच रेश्मा शेख, अख्तर, ग्राम विकास अधिकारी हरीश आंधळे, माजी सरपंच आख्तर शेख, ग्रामपंचायत सदस्य राजू उबाळे, अक्रम पटेल, महेंद्र खोतकर, वैभव चौधरी, पी व्ही गायकवाड, शेख जावेद, साहेबा चौधरी, लक्ष्मण खोतकर, ग्रामपंचायत कर्मचारी एकनाथ कीर्तीकर वळद गावचे माजी सरपंच रोहित राऊत, कांतू नवले उपमुख्य कार्यकारी अधिकारी पंचायत चंद्रहार ढोकणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभय धानोरकर, शिक्षणाधिकारी प्राथमिक, माध्यमिक अश्विनी लाठकर, जिल्हा कृषी अधिकारी प्रकाश पाटील, उपायुक्त पशुसंवर्धन नानासाहेब कदम, ग्रामीण पाणीपुरवठ्याचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेळके, गट विकास अधिकारी पंचायत समिती गंगापूर सुहास वाघचौरे, गट विकास अधिकारी पंचायत समिती छत्रपती संभाजीनगर शिवाजी साळुंके, गटविकास अधिकारी पंचायत समिती वैजापूर ज्ञानदेव जायभाये, विस्तार अधिकारी राधाकिसन चौधरी, घोडके, ग्रामसेवक संघटनेचे प्रवीण नलावडे, आसाराम बनसोडे, रमेश मुळे, अशोक गायकवाड, पी.एस पाटील, गंगाधर गायकवाड तसेच जिल्हा परिषदेचे कर्मचारी, शिक्षक, आरोग्य सेवक अंगणवाडी सेविका आशा वर्कर आरोग्य कर्मचारी व ग्रामपंचायतचे कर्मचारी सहभागी झाले होते.

# Gen Z पिढीचा घटता अटेंशन स्पॅन : डिजिटल युगातील एक गंभीर सामाजिक आणि शैक्षणिक आव्हान

**एकविसावे** शतक हे माहिती, तंत्रज्ञान आणि वेगवान जीवनशैलीचे शतक म्हणून ओळखले जाते. इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, सामाजिक माध्यमे आणि डिजिटल माध्यमांमुळे ज्ञानाचा महासागर प्रत्येकाच्या हातात आला आहे. आज कोणतीही माहिती मिळविण्यासाठी ग्रंथालयात जाण्याची आवश्यकता उरलेली नाही. काही सेकंदांत जगातील कोणत्याही विषयाची माहिती उपलब्ध होते. ही परिस्थिती मानवी इतिहासातील सर्वात मोठी माहिती क्रांती मानली जाते. मात्र, या क्रांतीचे अनेक सकारात्मक परिणाम दिसून येत असताना त्याचबरोबर काही गंभीर मानसिक, सामाजिक आणि शैक्षणिक आव्हानेही समोर येत आहेत. त्यापैकी सर्वाधिक चर्चिला जाणारा विषय म्हणजे ऋझप न पिढीचा घटता अटेंशन स्पॅन. माहितीचा वेग वाढत असताना विचारांची खोली कमी होत चालली आहे का, हा प्रश्न आज जगभरातील शिक्षणतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, पालक आणि धोरणकर्त्यांसमोर उभा राहिला आहे.

अटेंशन स्पॅन म्हणजे एखाद्या व्यक्तीची कोणत्याही विषयावर, काम ावर, संभाषणावर किंवा माहितीवर सलग, एकाग्र आणि विचलित न होता लक्ष केंद्रित ठेवण्याची क्षमता होय. ही क्षमता जितकी अधिक असेल तितके व्यक्तीचे आकलन, विश्लेषण, स्मरणशक्ती, निर्णयक्षमता आणि सर्जनशीलता अधिक प्रभावी असते. एखादे पुस्तक शांतपणे वाचणे, व्याख्यान लक्षपूर्वक ऐकणे, संशोधन करणे किंवा एखाद्या सम स्येवर सखोल विचार करणे यासाठी दीर्घकालीन एकाग्रतेची आवश्यकता असते. मात्र, लक्ष वारंवार विचलित होणे, काही क्षणांतच नवीन माहिती किंवा मनोरंजनाकडे वळणे, दीर्घ म जकूर वाचण्याचा कंटाळा येणे आणि सतत बदलणाऱ्या दृश्यांकडे आकर्षित होणे ही कमी होत चाललेल्या अटेंशन स्पॅनची प्रमुख लक्षणे मानली जातात.

ऋझप न ही साधारणपणे १९९७ ते २०१२ या कालावधीत जन्मलेली पिढी मानली जाते. ही पिढी जन्म ापासूनच इंटरनेट, स्मार्टफोन आणि डिजिटल साधनांच्या सहवासात वाढली आहे. त्यामुळे माहिती मिळविण्याची, संवाद साधण्याची, शिकण्याची आणि मनोरंजनाची त्यांची पद्धत पूर्वीच्या पिढ्यांपेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. या पिढीचे अनेक गुण विशेष उल्लेखनीय आहेत. तंत्रज्ञानाशी सहज जुळवून घेण्याची क्षमता, नवकल्पनांचा स्वीकार, जागतिक घडामोडींची माहिती, सर्जनशीलता आणि बदलांना जलद प्रतिसाद देण्याची वृत्ती ही त्यांची बलस्थाने आहेत. परंतु त्याच वेळी माहितीचा सतत होणारा मारा त्यांच्या एकाग्रतेवर परिणाम करत असल्याची चर्चा वाढत आहे.

**– डॉ. भारत द. कऱ्हाड**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली जिल्हा रत्नागिरी.**

या परिस्थितीमागे अनेक कारणे आहेत. सर्वप्रथम, स्मार्टफोन आणि सामाजिक माध्यमांचा वाढता वापर हे प्रमुख कारण आहे. दिवसातून शेकडो वेळा मोबाईल पाहण्याची सवय अनेकांमध्ये निर्माण झाली आहे. प्रत्येक काही मिनिटांनी येणाऱ्या सूचना, संदेश, व्हिडिओ आणि नवीन माहिती मेंदूचे लक्ष सतत विचलित करतात. दुसरे म्हणजे रील्स, शॉर्ट व्हिडिओ आणि काही सेकंदांत संपणाऱ्या दृश्य माध्यमांची वाढती लोकप्रियता. अशा माध्यमांमध्ये काही क्षणांतच नवीन दृश्य, नवीन माहिती आणि नवीन मनोरंजन मिळत असल्याने मेंदूला सतत बदलांची सवय लागते. परिणामी दीर्घ लेख, विस्तृत व्याख्याने किंवा सखोल चर्चा यामध्ये रस टिकवून ठेवणे कठीण जाऊ लागते.

तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे एका वेळी अनेक कामे करण्याची वाढती प्रवृत्ती. मोबाईलवर बोलणे, संगीत ऐकणे, सामाजिक माध्यमे वापरणे आणि अभ्यास करणे अशी अनेक कामे एकाच वेळी करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रत्यक्षात मेंदू एका वेळी अनेक गुंतागुंतीची कामे प्रभावीपणे करू शकत नाही. त्यामुळे प्रत्येक कामावर लक्ष केंद्रित होण्याचा कालावधी कमी होतो. चौथे कारण म्हणजे पुस्तक वाचनाची घटती सवय. लघु संदेश, संक्षिप्त पोस्ट आणि काही ओळींमध्ये माहिती मिळण्याची सवय झाल्यामुळे मोठे लेख, संशोधनपर साहित्य किंवा दर्जेदार पुस्तके वाचण्याचे प्रमाण कमी होत आहे. त्याचबरोबर अपुरी झोप, मानसिक ताण, सततची स्पर्धा, मनोरंजनाचे असंख्य पर्याय आणि तत्काळ सम ाधान मिळविण्याची मानसिकता यांचाही अटेंशन स्पॅनवर परिणाम होत आहे.

या बदलाचे परिणाम शिक्षण क्षेत्रात सर्वाधिक जाणवतात. विद्यार्थ्यांना दीर्घकाळ अभ्यास करणे, संदर्भग्रंथ वाचणे, सखोल उत्तरे लिहिणे किंवा संशोधनात्मक विचार करणे अधिक आव्हानात्मक वाटू शकते. परीक्षेपुरते ज्ञान मिळविण्याची प्रवृत्ती वाढते, परंतु विषयाचा गाभा समजून घेण्याकडे कमी लक्ष दिले जाते. चिकित्सक विचार, विश्लेषणात्मक क्षमता आणि कल्पनाशक्ती विकसित होण्यासाठी आवश्यक असलेला संयम कमी होऊ शकतो. उच्च शिक्षण, संशोधन आणि नवोपक्रमासाठी आवश्यक असलेली दीर्घकालीन एकाग्रता कमी पडण्याची शक्यता निर्माण होते.

याचा परिणाम केवळ शिक्षणापुरता मर्यादित राहत नाही. कार्यक्षेत्रातही एखादे काम पूर्ण होण्यापूर्वी दुसऱ्या कामाकडे वळण्याची प्रवृत्ती वाढू शकते. निर्णय घेताना आवश्यक तेवढा विचार न करणे, वरवरच्या माहितीवर मत तयार करणे, अफवा किंवा अपूर्ण माहितीवर विश्वास ठेवणे, मानसिक थकवा, चिडचिड आणि अस्वस्थता वाढणे अशी अनेक आव्हाने निर्माण होतात. प्रत्यक्ष संवादाचे प्रमाण कमी होऊन डिजिटल संवादावर अधिक अवलंबित्व निर्माण होऊ शकते. दीर्घकालीन नातेसंबंध, संयम आणि ऐकून घेण्याची क्षमता यांच्यावरही याचा अप्रत्यक्ष परिणाम होऊ शकतो.

पान ३ वर....

## आषाढी एकादशीनिमित्त १ लाख ४० हजार भाविकांना महाप्रसाद; अन्नपूर्णा केटरर्स वेलफेअर असोसिएशनचा सेवाभावी उपक्रम



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त छोट्या पंढरपूरकडे पायी दिंडीने जाणाऱ्या वारकरी भाविकांसाठी अन्नपूर्णा केटरर्स वेलफेअर असोसिएशन, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने भव्य महाप्रसाद व फराळ वाटपाचा सेवाभावी उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत तब्बल १ लाख ४० हजार भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. विठ्ठलाची आकर्षक मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

भाविकांच्या सेवेसाठी असोसिएशनने ११ क्विंटल साबुदाणा खिचडी, ३ क्विंटल फराळी चिवडा, २० हजार राजगिरा लाडू, १ टन मसाला दूध तसेच हजारो पाण्याच्या बाटल्यांचे वाटप केले. पहाटेपासूनच भाविकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला. वारकऱ्यांची मोठी गर्दी असूनही स्वयंसेवकांनी नियोजनबद्ध पद्धतीने सेवा बजावली. अन्नपूर्णा केटरर्स वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष कुशलजी मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला. या सेवा उपक्रमामुळे वारकरी भाविकांना मोठा दिलासा मिळाला. अन्नदान हीच सर्वोच्च सेवा मानणाऱ्या अन्नपूर्णा केटरर्स वेलफेअर असोसिएशनच्या या उपक्रमाचे भाविकांनी मनापासून कौतुक केले. भक्ती, सेवा आणि सामाजिक बांधिलकीचा संगम घडविणाऱ्या या उपक्रमामुळे आषाढी एकादशीचा उत्साह अधिकच द्विगुणित झाला.



“माझे वडील सलग ३५ वर्षे पायी दिंडीत सहभागी होत होते. त्या काळात अनेक सेवाभावी व्यक्तींनी त्यांना प्रेमाने भोजन दिले. त्यातूनच समाजाप्रती काहीतरी देण्याची प्रेरणा मिळाली. अमरनाथ यात्रेत जसे मोठ्या प्रमाणावर लंगर आयोजित केले जातात, त्याच धर्तीवर आम्हीही गेल्या चार वर्षांपासून वारकरी भाविकांच्या सेवेसाठी हा संकल्प सातत्याने पूर्ण करत आहोत.’ ते पुढे म्हणाले, ‘विठ्ठलाच्या चरणी माझी एकच प्रार्थना आहे की, राज्यात भरपूर आणि समाधानकारक पाऊस पडावा, शेतकरी सुखी व्हावा आणि प्रत्येक नागरिकाला निरोगी, आनंदी व समृद्ध आयुष्य लाभावे.

– **जयराम टेकाळे**, अन्नपूर्णा केटरर्स वेलफेअर असोसिएशन

# परिवर्तनवादी साहित्य संमेलनाचे उद्घाटक पालकमंत्री संजय शिरसाठ; स्वागताध्यक्षपदी उद्योजक ॲड. रामेश्वर तायडे

## दुसऱ्या नियोजन बैठकीत एकमताने महत्वपूर्ण निर्णय

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्या आयोजनासाठी रविवारी दि. २६ जुलै सुभेदारी गेस्ट हाऊस येथे दुसरी नियोजन बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. प्रा. शिवाजी वाठोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा छत्रपती संभाजीनगरचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांची संम ेलनाचे उद्घाटक म्हणून, तर ज्येष्ठ उद्योजक ॲड. रामेश्वर तायडे यांची स्वागताध्यक्ष म्हणून एकमताने निवड करण्यात आली. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात या निवडीचे स्वागत केले.





बैठकीची सुरुवात शाहीर उत्तमराव म्हस्के आणि कवी अनिल वानखेडे यांच्या परिवर्तनवादी कवितांनी झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते संमेलनाच्या अधिकृत बोधचिन्हाचे प्रकाशन करण्यात आले.

संमेलनाचे मुख्य संयोजक तथा निळे प्रतीक बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष रतनकुमार साळवे यांनी संमेलनाची उद्दिष्टे, स्वरूप आणि पुढील नियोजन यांचा सविस्तर आढावा घेतला. परिवर्तनवादी साहित्य चळवळीला अधिक व्यापक करण्यासाठी राज्यभरातील साहित्यिक, लेखक, कवी, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन हे संमेलन यशस्वी करावे, असे आवाहन त्यांनी केले.

स्वागताध्यक्ष म्हणून निवड झाल्यानंतर बोलताना ॲड. रामेश्वर तायडे म्हणाले, ‘हे राज्यस्तरीय साहित्य संमेलन असल्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील साहित्यिकांचा सहभाग असला पाहिजे. बुद्ध तत्त्वज्ञानाने प्रेरित परिवर्तनवादी विचारांचे साहित्यिक या विचारपीठावर यावेत. संमेलनाच्या प्रत्येक टप्प्यात पारदर्शकता राखून सर्वसमावेशक वातावरण निर्माण करणे आवश्यक आहे. या संमेलनाला कोणतेही गालबोट लागू नये, यासाठी सर्वांनी जबाबदारीने काम करावे. हे संमेलन राज्यातील परिवर्तनवादी साहित्य चळवळीचा आदर्श ठरेल, असा मला विश्वास आहे.‘

यावेळी ज्येष्ठ विचारवंत भीमराव सरोदे यांनी परिवर्तनवादी साहित्याची भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, ‘परिवर्तनवादी साहित्य हे केवळ शहरापुरते मर्यादित न राहता ग्रामीण भागातील सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे. नवोदित साहित्यिक, कवी आणि लेखकांना विचारपीठ मिळावे, यासाठी लहान-मोठी साहित्य संमेलने सातत्याने आयोजित होणे ही काळाची गरज आहे.‘ सामाजिक परिवर्तनासाठी साहित्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. अध्यक्षीय समारोपात प्रा. शिवाजी वाठोरे म्हणाले, ‘हे संमेलन सर्वसमावेशक असेल. येथे आलेला प्रत्येक व्यक्ती परिवर्तनवादी विचार घेऊन जाईल. संमेलनाच्या आयोजनात कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची सर्वांनी काळजी घ्यावी. एकमताने आणि समन्वयाने काम केल्यास हे संमेलन निश्चितच यशस्वी होईल.’ यावेळी ॲड. डी. व्ही. खिल्लारे, डॉ. धनराज गोंडाणे, राहुल साळवे, इंजि. राजधर दांडगे, महादेव डांबरे, अंबादास रगडे, एकनाथ त्रिभुवन, शैलेंद्र मिसाळ, डॉ. मधुकर दिवेकर, बाबुराव बनसोडे आणि ग. ह. राठोड यांनीही संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी मार्गदर्शक सूचना मांडल्या. बैठकीत परिवर्तनवादी साहित्य

संमेलनाच्या आयोजनासाठी इंजि. राजधर दांडगे यांनी पुढाकार घेत २५,००० रुपयांच्या आर्थिक मदतीची घोषणा केली. त्यांच्या या उदार योगदानाचे उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात स्वागत केले. त्यांच्या या घोषणेमुळे संमेलनाच्या आयोजनाला आर्थिक बळ मिळणार असून, इतरांनीही अशाच प्रकारे सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. त्यानंतर कॉकरोच जनता पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अभिजीत दिपके यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी उभारलेल्या संघर्षाबद्दल तसेच शिक्षणतज्ज्ञ आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी शिक्षण, पर्यावरण आणि जनहिताच्या प्रश्नांसाठी केलेल्या लढ्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्याचा ठराव एकमताने मंजूर करण्यात आला. हा अभिनंदनाचा ठराव ॲड. डी. व्ही. खिल्लारे यांनी मांडला. उपस्थित सर्व साहित्यिक, विचारवंत, पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात या प्रस्तावाला अनुमोदन देत अभिजीत दिपके आणि सोनम वांगचुक यांचे अभिनंदन केले.

बैठकीत संमेलनाची तारीख, स्थळ, विविध समित्यांची स्थापना, त्यांच्या जबाबदाऱ्या तसेच राज्यभर जनसंपर्क मोहीम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली. वैचारिकदृष्ट्या समृद्ध, शिस्तबद्ध आणि सर्वसमावेशक संमेलन घडविण्याचा निर्धार उपस्थितांनी व्यक्त केला.

या बैठकीस भीमराव गाडेकर, राहुल साळवे, सपकाळ, व्ही. बी. सपकाळ, विजय कांबळे, ग. ह. राठोड, महादेव डांबरे, रामदास कहाळे, बाबुराव बनसोडे, भीमराव सरोदे, राहुल मेश्राम, डॉ. धनराज गोंडाणे, प्रा. शिवाजी वाठोरे, ॲड. रामेश्वर तायडे, शाहीर उत्तमराव म्हस्के, अनिल वानखेडे, गौतम घाटसरे, डॉ. मधुकर दिवेकर, इंजि. राजधर दांडगे, अंबादास रगडे, एकनाथ त्रिभुवन, एम. एस. सुरडकर, एम. बी. घोरपडे, अजय बोर्डे आणि रमेश बी. वानखेडे यांच्यासह अनेक साहित्यिक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीचे सूत्रसंचालन भीम राव गाडेकर यांनी केले, तर डॉ. मधुकर दिवेकर यांनी आभार मानले. आगामी पहिल्या राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन राज्यातील परिवर्तनवादी साहित्य चळवळीच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी पर्व ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त करत संमेलन यशस्वी करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार केला.

## श्री नंदवंशी अहीर (गवळी) समाजाच्या १४ व्या सामूहिक विवाह सोहळा-२०२७ समितीच्या अध्यक्षपदी धीरजलाल किसनलाल सिद्ध यांची निवड



**छत्रपती संभाजीनगर (अट्टल मत प्रतिनिधी)**

श्री नंदवंशी अहीर (गवळी) समाजाच्या आगामी १४ व्या सामूहिक विवाह सोहळा-२०२७ समितीच्या अध्यक्षपदी श्री धीरजलाल किसनलाल सिद्ध यांची समाजाच्या एकमताने निवड करण्यात आली. ही निवड आज श्री कृष्ण समाज मंदिर, शिवाजीनगर, गुलमंडी, छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित समाजाच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आली.



बैठकीस समाजाचे चौधरी, ज्येष्ठ मान्यवर, माजी पदाधिकारी तसेच मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. सभेत सर्वांच्या संमतीने श्री धीरजलाल किसनलाल सिद्ध यांच्यावर अध्यक्षपदाची जबाबदारी सोपविण्यात आली. त्यांच्या निवडीचे सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात स्वागत करून अभिनंदन केले व आगामी सामूहिक विवाह सोहळा यशस्वी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी अध्यक्ष (२०२५) श्री सुनील सुंदरलाल बागवाले (सतिकर) तसेच माजी महिला अध्यक्षा (२०२५) सौ. संगीताताई शंकरलाल पाहाडीये यांचा विशेष गौरव करण्यात आला. श्री सुनील सुंदरलाल बागवाले यांनी सन २०२५ मध्ये श्री कृष्ण समाज मंदिर येथे संपन्न झालेल्या सामूहिक विवाह सोहळ्याचा सविस्तर अहवाल समाजाचे चौधरी व समाजबांधवांसमोर सादर केला.

यानंतर झालेल्या निवड प्रक्रियेत समाजाच्या सर्वानुमते श्री धीरजलाल किसनलाल सिद्ध यांची अध्यक्ष म्हणून निवड जाहीर करण्यात आली.

या सभेस समाजाचे चौधरी पूनमचंद हरिश्चंद्र बरेटीये, रमेश देवावाले, भुरेवाले, चेतन इंदरलाल जांगडे, माजी अध्यक्ष श्रावणलालजी पाहाडीये, गंगालाल फुन्नुलाल सिद्ध, ॲड. राजू पाहाडीये, दीपक हिलालल खरे, सुनील सुंदरलाल बागवाले, मोहिंदर बाखरीये, धीरजलाल किसनलाल सिद्ध, राजेश डोंगरे, शंकरलाल पाहाडीये, सतीश बरेटीये, रमेश खोलापुरे, भरतलाल रात्री, पवन फत्ते लष्कर, पवन जांगडे, शिव पाहाडीये, माधवलाल पाहाडीये, संदीप दीपवाल, श्यामभैय्या गौरक्षक, परमानंद बरेटीये, राजू बारीकरालवाले, सुरज तुलसीबागवाले, सुरज खुनिवाले, प्रेम गौरक्षक, धनराज मेघावाले, युवराज मेघावाले, संतोष मेघावाले, हंसराज गौरक्षक, सजन जांगडे, पूनम गौरक्षक, शंकर मंडले, युवराज बरेटीये, संजय भातेवाले, उमेश खुनिवाले यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते. सभेच्या शेवटी समाजाच्या एकोप्याने व सहकार्याने २०२७ चा १४ वा सामूहिक विवाह सोहळा यशस्वी करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

पान २ वरून

## Gen Z पिढीचा घटता अटेंशन स्पॅन : डिजिटल युगातील एक गंभीर सामाजिक आणि शैक्षणिक आव्हान

तथापि, या परिस्थितीकडे केवळ नकारात्मक दृष्टीने पाहणे योग्य ठरणार नाही. ऋशप न पिढी अत्यंत वेगाने शिकते, नवीन तंत्रज्ञान स्वीकारते, बदलांशी जुळवून घेते आणि सर्जनशीलतेने काम करते. त्यामुळे समस्या तंत्रज्ञानात नसून त्याच्या असंतुलित वापरामध्ये आहे. योग्य सवयी आणि संतुलित जीवनशैलीद्वारे एकाग्रता निश्चितच वाढविता येऊ शकते. यासाठी काही प्रभावी उपाय आवश्यक आहेत. सर्वप्रथम डिजिटल शिस्त विकसित करणे गरजेचे आहे. मोबाईल आणि सामाजिक माध्यमांच्या वापरासाठी निश्चित वेळ ठरविणे, अभ्यास किंवा कामाच्या वेळी अनावश्यक सूचना बंद ठेवणे आणि काही काळ मोबाईलपासून पूर्णपणे दूर राहण्याची सवय लावणे आवश्यक आहे. नियमित पुस्तक वाचन, वृत्तपत्रांचा अभ्यास आणि चिंतनपर लेखांचे वाचन यामुळे एकाग्रता आणि विचारक्षमता वाढते. ध्यान, योग, प्राणायाम आणि नियमित शारीरिक व्यायाम यांचा मेंदूच्या कार्यक्षमतेवर सकारात्मक परिणाम होतो. पुरेशी झोप, संतुलित आहार आणि वेळेचे योग्य नियोजन यामुळे मानसिक स्थैर्य वाढते.

शैक्षणिक संस्थांनीही बदलत्या परिस्थितीनुसार अध्यापन पद्धती विकसित करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ माहिती देण्यापेक्षा त्यांना प्रश्न विचारण्यास, चर्चा करण्यास, विश्लेषण करण्यास आणि प्रत्यक्ष अनुभवातून शिकण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. पालकांनी मुलांसोबत संवाद वाढवावा, त्यांना वाचनाची सवय लावावी आणि तंत्रज्ञानाचा वापर ज्ञान, कौशल्य आणि सर्जनशीलतेसाठी कसा करायचा याचे मार्गदर्शन करावे. शासन, शिक्षणसंस्था, पालक आणि विद्यार्थी यांनी एकत्रितपणे डिजिटल साक्षरता, मानसिक आरोग्य आणि एकाग्रता विकास यांना प्राधान्य दिल्यास या समस्येवर प्रभावीपणे मात करता येईल.

एकूणच, ऋशप न पिढीचा घटता अटेंशन स्पॅन ही केवळ वैयक्तिक समस्या नसून बदलत्या सामाजिक, तांत्रिक आणि शैक्षणिक वातावरणाचे प्रतिबिंब आहे. तंत्रज्ञानाचा विरोध करण्याऐवजी त्याचा संतुलित, जबाबदार आणि उद्देशपूर्ण वापर करणे ही काळाची गरज आहे. माहितीचा वेग आणि विचारांची खोली, डिजिटल सुविधा आणि मानवी एकाग्रता, आधुनिकता आणि आत्मशिस्त यांच्यात योग्य समतोल राखता आला, तर हीच पिढी ज्ञान, संशोधन, नवोपक्रम आणि सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी नेतृत्व करू शकेल. म्हणूनच अटेंशन स्पॅन वाढविणे ही केवळ वैयक्तिक सवय नसून भावी समाजाच्या बौद्धिक आणि सांस्कृतिक विकासाची महत्त्वाची पूर्वअट आहे.

# राज्यावर कोणतेही संकट येऊ नये; माझा बळीराजा सुखी आणि समाधानी राहावा, तसेच सर्वांचे निरोगी आयुष्य राहो- पालकमंत्री संजय शिरसाट यांची पांडुरंगाच्या चरणी प्रार्थना

## नगरसेवक किशोर नागरे यांच्या वतीने आयोजित ११ व्या पायी दिंडी सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद







**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शिवसेना गटनेते तथा नगरसेवक किशोर नागरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ११ व्या पायी दिंडी सोहळ्याला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. राज्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते एच-११, हडको येथील किशोर नागरे यांच्या संपर्क कार्यालयातून पहाटे दिंडीचे शुभारंभ करण्यात आले. त्यानंतर निळकंठेश्वर मंदिरात श्री विठ्ठल-रुक्मिणीची आरती करून दिंडी छोट्या पंढरपूरच्या दिशेने भक्तिमय वातावरणात मार्गस्थ झाली.

दिंडी सोहळ्यात महापौर समीर राजूरकर, माजी महापौर नंदकुमार घोडेले, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर, वारकरी संप्रदायातील भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. टाळ-मृदुंगाचा निनाद, हरिनामाचा अखंड गजर आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर विठ्ठलमय झाला होता.

दिंडीत कोणालाही अडचण होणार नाही यांची संपूर्ण काळजी किशोर नागरे यांच्या कुटुंबीयांनी घेतली. पांडुरंगाची सेवाच आपल्या हातुन होत आहे. असा भाव मनात आणून त्यांनी भाविकांची सेवा केली.

यंदाच्या दिंडीचे विशेष आकर्षण म्हणजे सहभागी झालेले चिमुकले विद्यार्थी. विठ्ठल, रुक्मिणी आणि वारकऱ्यांच्या पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या बालवारकऱ्यांनी उपस्थितांची मने जिंकली. त्यांच्या निरागस भक्तीभावाने आणि उत्साहाने दिंडीच्या वातावरणात अधिकच चैतन्य निर्माण झाले. यावेळी पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिंडीला शुभेच्छा देताना विठ्ठलाच्या चरणी राज्याच्या कल्याणासाठी प्रार्थना केली. ते म्हणाले, 'पांडुरंगाच्या चरणी माझी एकच प्रार्थना आहे की, राज्यावर कोणतेही संकट येऊ नये. माझा बळीराजा सुखी आणि समाधानी राहावा. राज्यभर चांगला व दमदार पाऊस पडून शेतकऱ्यांच्या जीवनात सुख, समृद्धी आणि भरभराट नांदो, हीच विठुरायाच्या चरणी प्रार्थना आहे.' दिंडीचे आयोजन किशोर नागरे यांच्या वतीने करण्यात आले असून, वारकऱ्यांच्या निवास, भोजन, पिण्याचे पाणी, वैद्यकीय मदत आणि इतर आवश्यक सोयी-सुविधांची उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली होती. शिस्तबद्ध नियोजन, भक्तीमय वातावरण आणि सामाजिक ऐक्याचा संदेश देणाऱ्या या पायी दिंडीने वारकरी परंपरेचे म हत्त्व पुन्हा अधोरेखित केले. आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित या सोहळ्यामुळे संपूर्ण परिसर विठ्ठलनामाच्या जयघोषाने दुमदुमून गेला आणि भक्ती, सेवा व सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाला.

## श्री माहेश्वरी मंडळाची आषाढी पायी दिंडी भक्तिमय वातावरणात संपन्न; वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविणा यादव सहकुटुंब सहभागी



**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त श्री माहेश्वरी मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेली पारंपरिक पायी दिंडी भक्तिमय वातावरणात उत्साहात पार पडली. गिरिजा माता मंदिरातून महाआरतीने दिंडीचा शुभारंभ झाला. त्यानंतर टाळ-मृदुंगाच्या निनादात, हरिनामाच्या अखंड गजरात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात दिंडी छोट्या पंढरपुरातील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराकडे मार्गस्थ झाली. या दिंडीत बेगमपुरा पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविणा यादव यांनी सहकुटुंब सहभाग घेतला. पोलीस अधिकारी म्हणून सामाजिक आणि धार्मिक उपक्रमांमध्ये नागरिकांसोबत सहभागी होण्याचा त्यांचा हा सहभाग उपस्थितांच्या विशेष कौतुकाचा विषय ठरला. मंदिरात जावून त्यांनी विठ्ठल-रुक्मिणीचे मनोभावे दर्शन घेतले.

यावेळी भावना व्यक्त करताना वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविणा यादव म्हणाल्या, 'आषाढी एकादशी हा केवळ धार्मिक उत्सव नसून समाजात एकात्मता, शिस्त, सेवा आणि संस्कार रुजविणारा महत्त्वाचा सोहळा आहे. वारकरी परंपरेतून समता, संयम आणि सेवाभावाचा संदेश दिला जातो. अशा दिंड्यांमुळे समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. सर्वांनी वाहतूक नियमांचे पालन करत सुरक्षितपणे या उत्सवात सहभागी व्हावे, हीच अपेक्षा आहे.'

दिंडीत लहान मुलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सुमारे ५०० ते ७०० वारकरी भाविकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. भगव्या पताका, तुळशीच्या वृंदावनासह चालणाऱ्या महिला, अभंग-भजनांचा गजर, फुगड्या आणि विठ्ठलनामाच्या अखंड घोषामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनानंतर श्री माहेश्वरी मंडळ, वाळूज प्रभागाच्या वतीने सर्व भाविकांसाठी अल्पोपाहाराची व्यवस्था करण्यात आली. तसेच दिंडीत सहभागी झालेल्या भाविकांच्या सोयीसाठी परतीच्या प्रवासासाठी बससेवेचीही व्यवस्था करण्यात आली होती. मंडळाच्या या नियोजनाचे वारकरी आणि नागरिकांनी कौतुक केले. वारकरी संप्रदायाच्या सेवेला प्राधान्य देत समाजोपयोगी कार्यातून सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला. श्री माहेश्वरी मंडळाच्या या पायी दिंडीने भक्ती, सेवा आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम घडवत आषाढी एकादशीचा उत्सव अधिक संस्मरणीय केला.

## कै. रावसाहेब धोंडिबा अधाने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सलग नवव्या वर्षी महाप्रसाद; सेवाभावातून आषाढी एकादशी साजरी

**छत्रपती संभाजीनगर**
**(अट्टल मत प्रतिनिधी)**

आषाढी एकादशीच्या पावन पर्वानिमित्त शहरासह जिल्हाभरात विविध सामाजिक संस्था, संघटना आणि स्वयंसेवी संस्थांच्या (एनजीओ) वतीने भक्तीमय वातावरणात सेवा व जनकल्याणकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. वारकरी संप्रदायाच्या सेवेला प्राधान्य देत अनेक संस्थांनी समाजोपयोगी उपक्रम राबवत सामाजिक बांधिलकीची जपणूक केली. याच पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथे दिवंगत रावसाहेब धोंडिबा अधाने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अधाने परिवारातर्फे सलग नवव्या वर्षी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाची माहिती भास्कर अधाने यांनी दिली.यावेळी बोलताना भास्कर अधाने म्हणाले की, 'रावसाहेब धोंडिबा अधाने यांच्या स्मृतीप्रित्यर्थ कृतज्ञता व्यक्त करण्याच्या भावनेतून गेल्या नऊ वर्षांपासून महाप्रसादाचे आयोजन करण्यात येत आहे. याशिवाय दरवर्षी मैसमाळ येथे अन्नदानाचा उपक्रमही राबविला जातो.



वारकरी आणि गरजूंना सेवा देण्याचे भाग्य लाभत असल्याचा आम्हाला आनंद आहे.' ते पुढे म्हणाले, 'पांडुरंगाच्या चरणी आमची एकच प्रार्थना आहे की, आमचा बळीराजा सुखी राहावा. राज्यात चांगला पाऊस पडून शेती समृद्ध व्हावी. शेतकरी बांधव सुखी, सम ाधानी आणि समृद्ध जीवन जगावा, हीच विठ्ठल चरणी प्रार्थना आहे.'

सिल्वर इन हॉटेलचे संचालक असलेले भास्कर अधाने आणि त्यांच्या पत्नी यांनी सांगितले की, हा उपक्रम केवळ धार्मिक परंपरेचा भाग नसून समाजाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव आणि ज्येष्ठांच्या स्मृतीप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न आहे. समाजातील गरजूंना अन्नदान व सेवा देण्याच्या माध्यमातून सामाजिक ऐक्य अधिक बळकट करण्याचा प्रयत्न अधाने परिवार सातत्याने करत आहे.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या या सेवा उपक्रमांमुळे समाजात सेवाभाव, बंधुभाव, एकात्मता आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ होत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. भक्ती आणि समाजसेवेचा सुंदर संगम घडविणाऱ्या या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक , प्रकाशक व संपादक - श्री. रशपालसिंघ एन.अट्टल यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४५, सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर सिडको, औरंगाबाद ४३१००५ (महा.) येथे छापून कार्यालय : शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७ पोलीस स्टेशन जवळ, सिडको , औरंगाबाद ४३१००३, (महा.) येथे प्रसिध्द केले. या अंकातील मजकुराशी संपादक जबाबदार राहतीलच असे नाही ( यासंबधी कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयात राहील.) मो. ७५८८१६६४९६, ९६२३४८४४८४. email : attalmat@gmail.com. RNI.No. MAHMAR/2007/21199